वर्ष : ०४ | अंक: ७ | मुंबई, मंगळवार ९ जानेवारी २०१८ ते १५ जानेवारी २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 अग्निकांडाची मालिका थांबणार कधी ?

3 → सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता कराल तर.. सावधान!

भारतासाठी धोक्याची घंटा ← 4




## मुंबई पोलीस आणि आरटीओ या मोटारीवर कारवाई करतील काय ?




# ‘कोकणची राख करणारा आणि गुजरातमध्ये रांगोळी काढणारा विकास खपवून घेणार नाही’




**नवी मुंबई : मुंबईतील अर्थिक केंद्र आणि बुलेट ट्रेन गुजरातमध्ये नेणाऱ्यांनी सत्यानाश करणारे रासायनिक प्रकल्प आमच्या माथी मारले आहेत. जैतापूर प्रकल्पापाठोपाठ राजापूरमध्ये आता रिफायनरी उभी राहत आहे. त्यामुळे कोकणच्या सौंदर्याचा नाश होणार आहे. मेक इन इंडियाच्या या धोरणामुळे कोकणची राख होणार असून गुजरातमध्ये मात्र विकासाची रांगोळी काढली जाणार आहे. असा विकास शिवसेना कदापीही सहन करणार नाही, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला.**

वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल कोकण महोत्सवामध्ये शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सचिन धर्माधिकारी यांना नवउद्योग निर्माण गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला सुमारे ८० हजार अनुयायी उपस्थित होते. त्यांना संबोधित करताना ठाकरे यांनी सरकारच्या सत्यानाश करणाऱ्या विकास धोरणाचा जोरदार समाचार घेतला. मेक इन इंडियाच्या नावाखाली आपल्याला सध्या विकासाची स्वप्ने दाखविली जात आहेत. जे चांगले आहे, ते सर्व भकास आणि नष्ट होणार असेल तर याला विकासाची स्वप्न म्हणता येणार नाही. इस्त्रायलने वाळवंटामध्ये शेती केली असा उल्लेख जगात होत आहे. जर आपला विकास हा चांगल्या गोष्टींचा सत्यानाश करणार असले तर आपलाही उल्लेख महाराष्ट्राने हिरवळीचे वाळवंट केले असा होईल. हे सर्व थांबायचे असेल आणि कोकणचा विकास खऱ्या अर्थाने करायचा असेल तर राजकीय जोडे बाहेर काढून तुमच्याबरोबर येण्याची माझी तयारी आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रतर्फे ठाणे महापौराच्या हस्ते पत्रकारांना पुरस्कार प्रदान

**ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथील ‘पोलीस बातमी पत्र’चे संपादक श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांना ठाणे महापौर मिनाक्षी शिंदे यांच्या हस्ते पत्रकार पुरस्कार देण्यात आला**






ठाणे, ठाणे तसेच पालघर जिल्हयातील विविध विभागात पत्रकारीता करणारे संपादक तसेच पत्रकारांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. ६ जानेवारी २०१८ रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून जर्नलिस्ट युनिअन ऑफ महाराष्ट्र पत्रकार पूरस्कार वितरण सोहळा ठाणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर दत्ताराम म्हात्रे यांच्या पोवाडे भारुड, युगपुरुषांची माहीती देणारी गाणी गाऊन झाली. यानंतर मुंबई ठाणे पालघर विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मिरा भाईंदर चे पोलिस बातमी पत्रचे संपादक श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांना ठाणे महानगर पालिकेच्या महापौर मिनाक्षी शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. जम्मू काश्मीरचे आय पी एस कमांडींग ऑफीसर शैलेंद्र मिश्र, जेष्ठ नगरसेवक नरेश मणेरा, नगरसेवक गुरुमुख सिंग,

उर्वरित पृष्ठ 4 वर

# हुक्काच्या कोळशाने घेतला १४ जणांचा बळी



**मुंबई - मोजोस पबमध्ये दिल्या जाणाऱ्या हुक्क्यासाठी लागणाऱ्या जळत्या कोळशामुळे कमला मिल कंपाऊंडमध्ये आग लागल्याचे मुंबई अग्निशमन दलाने पालिका आयुक्त अजोय मेहता यांना सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. या अहवालामुळे पोलरस तपासाची दिशा बदलण्याची शक्यता आहे. या घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला होता.**

‘मोजोस’मध्ये हुक्क्यासाठी लागणाऱ्या जळत्या कोळशातून आगीची ठिणगी पडद्यावर पडली. तेथील जळाऊ वस्तू आणि वाऱ्यामुळे ही आग पसरत वन अबोव्ह पबपर्यंत पसरली, असे या अहवालात नमूद आहे. वन अबोव्हला गच्चीवर उपाहारगृह सुरू करण्याची परवानगी देण्यात आली नव्हती. चौकशीदरम्यान ‘मोजोस’च्या व्यवस्थापकांकडून पालिकेने दिलेले कोणतेही परवाने सादर केले नसल्याचेही त्यात नमूद आहे; मात्र अग्निशमन दलाने अहवालात ही आग ‘मोजोस’मधून लागल्याचे नमूद केले आहे. हा पब निवृत्त पोलिस अधिकारी के. के. फाटक यांचा पुत्र युग आणि गायक शंकर महादेवन यांचा पुत्र सिद्धार्थ यांच्या मालकीचा आहे.

**कोळशामुळे आगीत तेल!**

**या दोन्ही पबमध्ये मोठ्या प्रमाणात हुक्काचे साहित्य सापडले. त्यात कोळशाचा साठा होता. दोन्ही पब गच्चीवर असल्याने वेगाने वारा वाहत होता. कोळशामुळे आगीत तेल ओतले गेले, असे अग्निशमन दलाच्या अहवालात नमूद आहे.**

## सौजन्य व्हॉट्सअप




# मुंबईत शिवसेनेच्या माजी नगरसेवकाची निघृण हत्या

मुंबईतील कांदिवली समतानगरचे शिवसेनेचे माजी नगरसेवक अशोक सावंत यांची रविवारी रात्री चॉपरने वार करून निघृण हत्या करण्यात आली. सावंत रात्री आपल्या मित्रांना भेटून घरी परतताना त्यांच्यावर हा हल्ला करण्यात आला. इमारतीखाली हे अज्ञात हल्लेखोर गाडीत लपून बसले होते. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. सावंत हे रात्री ११ च्या सुमारास आपल्या मित्रांना भेटून घरी परतत असताना त्यांच्यावर हा हल्ला झाला. समतानगरमधील त्यांच्या इमारतीखाली हे हल्लेखोर गाडीत लपून बसले होते. सावंत इमारतीखाली पोहोचताच या अज्ञात हल्लेखोरांनी त्यांना गाठले आणि त्यांच्यावर चॉपरने वार केले अशी माहिती पोलिसांनी दिली. त्यांना उपचारासाठी त्वरीत जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तत्पूर्वीच सावंत यांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, इमारतीतील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे.



# अग्निकांडाची मालिका थांबणार कधी?

**मुंबई - साकीनाका येथील फरसाण मार्टची आग, कमला मिल कम्पाउंड येथील आग, अंधेरी येथील इमारतीला लागलेली आग आणि शुक्रवारी नागपाडा येथील जिया इमारतीला लागलेली आग; अशा आगीच्या सलग घटनांनी मुंबई शहर आणि उपनगर होरपळून निघाले आहे. मागील काही दिवसांमध्ये घडलेल्या या घटनांमध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मात्र तरीही महापालिका प्रशासन मूग गिळून गप्प बसले आहे. आगीच्या घटनांनंतर झालेली कारवाई ही तात्पुरत्या स्वरूपाची असून, यावर ठोस उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञांनी मांडले आहे. अशाच काहीशा आगीच्या तोंडावर असलेल्या मुंबईत नक्की काय खबरादारी घेतली पाहिजे; याचा आढावा यानिमित्ताने घेण्यात येत आहे.**



कमला मिल कम्पाउंडमधील हॉटेलमध्ये आग लागण्याची दुर्घटना घडल्यानंतर पालिका आणि अग्निशमन दलाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अग्निशमन दलाकडून सुरुवातीला हॉटेल, इमारती आणि कार्यालयांना ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. त्यानंतर त्याचे नूतनीकरण करणे, नूतनीकरण न केलेल्या हॉटेल आणि इमारतींवर कारवाई करणे, त्याची तपासणी करणे ही संपूर्ण जबाबदारी पालिकेकडे आहे.

परंतु मागील काही आगीच्या दुर्घटनांवरून ही जबाबदारी पेलण्यात पालिका अपुरी पडत असल्याचे चित्र आहे. यावर उपाय म्हणून अग्निशमन दल ना हरकत प्रमाणपत्र, त्याचे नूतनीकरण, तपासणी यासाठी स्वतंत्र सेल तयार करणार आहे.

ना हरकत प्रमाणपत्र तयार करणे, त्याचे नूतनीकरण करणे व त्याची तपासणी करणे यासाठी अग्निशमन दल नवा विभाग तयार करणार आहे. या विभागामध्ये ५० अधिकारी व ५० ते ६० कर्मचारी असण्याची शक्यता आहे. या सेलमधील अधिकारी ज्या हॉटेल, कार्यालयांमध्ये अपुरी फायर फायटिंग सिस्टिम, ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण केलेले नसेल अशा हॉटेल आणि कार्यालयांवर कोणतीही दंडात्मक कारवाई न करता थेट परवाना रद्द करू शकतात.

अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जो अर्ज केला जातो, त्या अर्जाला 'बी फॉर्म' म्हटले जाते. या अर्जात अग्निशामक, अग्निप्रतिबंधक यंत्रणेबाबतची माहिती आणि पूर्ततेबाबतचे पुरावे अग्निशमन विभागाकडे सुपुर्द करावे लागतात. त्यानंतरच अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते.

ना हरकत प्रमाणपत्राचे दरवर्षी नूतनीकरण करणे गरजेचे आहे. परंतु असंख्य हॉटेल्स, कार्यालये या प्रमाणत्राचे नूतनीकरण करत नाहीत. अग्निशमन विभागाकडून त्याबाबत कोणत्याही प्रकारची तपासणी केली जात नाही. तपासणी करण्याची संपूर्ण जबाबदारी पालिकेची असते. परंतु ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी करण्यात पालिका अपुरी पडत असल्याचे मागील काही आगीच्या दुर्घटनांमधून निदर्शनास आले आहे.

# आता रेल्वेप्रवासातही मिळणार आरोग्यसेवा

**मुंबई - रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या प्रवासामध्ये सक्षम वैद्यकीय सोयीसुविधा नसतात त्यामुळे या प्रवासादरम्यान काही आरोग्यासंदर्भात समस्या उद्भवली तर ही भीती प्रवाशांना भेडसावत असते. रेल्वे प्रवाशांच्या आरोग्यसुविधांसंदर्भात केंद्रसरकारने आता गांभीर्याने विचार केला आहे.**



रेल्वेमध्ये डॉक्टर, फार्मासिस्ट आणि परिचारिका यांची नियुक्ती केली आणार आहे प्रवाशांसाठी अत्यावश्यक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी रेल्वे बोर्ड तसेच केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेने काही महत्त्वाची पावले उचलली आहे. रेल्वे बोर्डाच्या आरोग्य विभागाने प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांमधील गार्ड आणि सर्व रेल्वे स्थानकांचे स्टेशन मास्तर यांच्याजवळ अत्यावश्यक औषधांसह ड्रेसिंग सामुग्री असलेल्या प्रथमोपचार पेट्या असतील, हे कटाक्षाने पाळले जाणार आहे. रेल्वे प्रवासादरम्यान आरोग्यविषयक कोणत्या बाबी सरकारकडून करण्यात आलेल्या आहेत, याची विचारणा युनियन ऑफ रजिस्टर्ड फार्मासिस्ट्स या संघटनेचे उमेश खरे यांनी पंतप्रधानांकडे पत्राद्वारे केली होती. त्यात जेनेरीक औषधांची उपलब्धता, वैद्यकीय यंत्र सामुग्रींना औषधांचा दर्जा मिळण्यासंदर्भात किंमत नियंत्रित करण्यात आली आहे का, याचीही विचारणा करण्यात आली होती. दूरवरचा प्रवास असेल वा अपघातसदृश्य परिस्थितीमध्ये अनेकदा प्रवाशांना आरोग्यसेवा मिळत नाही. त्यामुळे प्रवासादरम्यान आरोग्याशी संबधित काही महत्त्वाच्या बाबींवर विचार करण्यात आला आहे का, असेही खरे यांनी पत्रामध्ये विचारले होते. या प्रश्नांची उत्तरे देताना पंतप्रधान कार्यालयाने रेल्वेबोर्डाच्या आरोग्यविभागाने केलेल्या महत्वपूर्ण बदलांची माहिती दिली आहे.

प्रमुख रेल्वे स्थानकांवर आणि राजधानी, शताब्दी एक्सप्रेस गाड्या, लांब पल्ल्याच्या गाड्यांचे अधीक्षक, गार्ड यांच्याजवळही गरज भासू शकणाऱ्या औषधांचा साठा देण्यात येणार आहे. अपघातग्रस्त परिस्थितीमध्ये लागणारे वैद्यकीय सामुग्री असलेल्या प्रथमोपचार पेट्या देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रवासी कोणत्याही अडीअडचणीच्या वेळी त्याची मागणी करू शकतात, असेही रेल्वेबोर्डाच्या आरोग्यविभागाने स्पष्ट केले आहे.

# 'आरे' मध्ये झाडांना विषारी इंजेक्शन

**मुंबई-** आरे दुग्ध वसाहतीतील वृक्षसंपत्ती नष्ट व्हावी म्हणून आता झाडांच्या मुळाशी विषारी औषध घातले जात असल्याचा आरोप 'आरे'तील नागरिक करत आहेत. युनिट क्रमांक १३ येथील दोन मोठ्या वृक्षांच्या बुंध्यावर खोल छिद्रे पाडून त्यात ॲसिडसदृश्य विषारी औषध टाकल्याचे दिसून आले असून यासंदर्भात आरे पोलिस ठाण्यामध्ये तक्रार अर्ज देण्यात आला आहे. महापालिकेकडे यासंदर्भात तक्रार नोंदवून घेतल्याशिवाय पोलिसी कारवाईला सुरुवात होत नाही. त्यामुळे यासंदर्भात अद्याप एफआयआर दाखल झालेली नाही.

आरे कॉलनीतील दोन मोठे वृक्ष तोडण्याचे हेतुने या झाडांना ॲसीड टाकुन इजा पोहचवीणा-यांचा शोध घेवून त्यास शिक्षा झाली पाहीजे.आरे कॉलनीतील स्थानिक नागरीकांनी हे वृक्ष वाचवीण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मंगळवारी दोन जानेवारी रोजी हा तक्रारअर्ज देण्यात आला असून यासंदर्भात बुधवारच्या बंदमुळे पी दक्षिण विभागाकडे तक्रार नोंदवता आली नाही, अशी माहिती तक्रारदार निलेश धुरी आणि शांताराम बांगर यांनी दिली. दरम्यान ही बहरलेली झाडे आता मलूल पडली असून वेळीच काळजी न घेतल्यास ती सुकून मरतील अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. यातील एक झाड पिंपळाचे असून दुसरे जांभळाचे आहे. या झाडांसोबतच युनिट क्र. १३ येथील गोठ्याशेजारी विविध प्रकारचे अनेक मोठमोठे वृक्ष आहेत. या वृक्षांनाही धोका आहे, असे धुरी म्हणाले.

'आरे'तील कृषी विभागाने सुमारे ६५ वर्षांपूर्वी लावलेल्या रोपांचे आज प्रचंड वृक्ष झाले आहेत. या वृक्षांची खुलेआम कत्तल केली जात आहे, असा आरोप धुरी यांनी केला. सुमारे २२ वर्षांपूर्वी आरेतील



सुकलेल्या, मेलेल्या तसेच पावसाळ्यात पडलेल्या झाडांसाठी कंत्राट देण्यात येऊ लागले. तेव्हापासूनच अशा पद्धतीने झाडाच्या खोडावर छिद्र पाडून त्यात विशिष्ट प्रकारचे रसायन टाकून झाडे मारण्यात येवू लागली, असाही आरोप बांगर आणि धुरी या तक्रारदारांनी केला आहे.

**अद्याप कार्यवाही नाही**

योग्य मार्गदर्शनाअभावी ही तक्रार अजूनही वृक्ष प्राधिकरणापर्यंत किंवा पी दक्षिण येथील उद्यान विभागापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे दोन्ही झाडे वाचवण्यासाठी अजून कार्यवाही सुरू झाली नाही. यासंदर्भात पी दक्षिण येथील उद्यान विभागाचे सहाय्यक अधीक्षक सचिन पारखे यांनी यासंदर्भातील तक्रार विभागाकडे दाखल झाल्यावर पोलिसांना पत्र देऊन एफआयआर नोंदवण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. रसायने घालून झाड मारण्याचा प्रयत्न झाला असला तरी पिंपळाचे झाड वाचू शकते असाही दिलासा त्यांनी दिला. या झाडांच्या मुळाशी पाणी घालत राहावे अशा सूचना त्यांनी दिल्या. महापालिकेचे उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी यांनी वृक्ष प्राधिकरणाला यासंदर्भात कोणतीही तक्रार मिळाली नसल्याचे सांगत अशी तक्रार वृक्ष प्राधिकरणाकडे थेट आल्यास महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीसाठी सूचना देण्यात येतात अशी माहिती दिली.

# मुंबई महापालिकेच्या आयुक्तांची नाकी टेस्ट करा: मनसे

**मुंबईः कमला मिल कम्पाउंडमधील आगीच्या दुर्घटनेनंतर राजकीय नेत्यांकडून प्रचंड दबाव आल्याचा गौप्यस्फोट करणारे मुंबई महापालिका आयुक्त अजॉय मेहता यांची नाकी चाचणी करा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं केली आहे.**



कमला मिल आगीच्या दुर्घटनेनंतर महापालिकेनं शहरातील बेकायदा बांधकामावर कारवाईला सुरुवात केली होती. या कारवाईमुळं मुंबईतील अनेक हॉटेल व बारमालक हादरून गेले. कारवाई सुरू असताना सुमारे २८ हॉटेल, बार मालकांच्या वतीनं मेहता यांना राजकीय नेत्यांचे फोन गेले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मेहता यांनी काल ही माहिती दिली. मात्र, फोन करणाऱ्यांची नावं मला उघड करता येणार नाहीत. विरोधी पक्षनेते याबाबत सांगू शकतील, असं ते म्हणाले होते.

मेहता यांच्या या वक्तव्यामुळं राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. मेहता यांनी नावं जाहीर करावीत, अशी मागणी सर्वच पक्षांनी केली. मनसेने मात्र एक पाऊल पुढं जाऊन आयुक्तांच्या नाकी चाचणीची मागणी केली आहे. 'मुंबईच्या नागरिकांनी सध्याच्या सत्ताधाऱ्यांना पारदर्शी कारभारासाठी निवडून दिलं आहे. त्यामुळं खरं काय ते लोकांना सांगण्याची त्यांची जबाबदारी आहे. मेहता यांच्यावर दबाव आणणारा नेता महापालिकेतील सत्ताधारी पक्षाचा आहे की विरोधी पक्षातला 'भैया' आहे हे कळायलाच हवे. आयुक्त त्या नेत्याचं नाव सांगणार नसतील तर त्यांची नाकी टेस्ट करण्यात यावी,' अशी मागणी मनसेचे माजी नगरसेवक संदीप देशपांडे यांनी ट्विटरद्वारे केली आहे.

'कमला मिलमधील आगीनंतर या प्रकरणातील काही आरोपी फरार आहेत. पोलीस अजूनही त्यांना शोधू शकलेले नाहीत. आयुक्तांप्रमाणेच पोलिसांवरही दबाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी देखील लक्ष घालण्याची गरज आहे.' असंही देशपांडे यांनी म्हटलं आहे.

# बनावट प्रमाणपत्रांप्रकरणी म्हाडा अधिकाऱ्यांची चौकशी सुरू

**मुंबई–** मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुधारणांची कामे करताना कच्चा माल व कामाच्या दर्जाची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याप्रकरणी दक्षता विभागाने म्हाडातील ५६ अधिकाऱ्यांची चौकशी सुरू केली आहे. एकाच वेळेस एवढ्या मोठ्या संख्येने चौकशी करण्याची म्हाडाच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. मुंबई झोपडपट्टी सुधारणा मंडळामार्फत मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये विकासाची काम केली जातात. यामध्ये संरक्षक भिंती, टॉयलेट ब्लॉक, व्यायामशाळा, स्मशानभूमीचा विकास, बगिच्यांचे सुशोभिकरण, मलनिस्सारण वाहिन्या, जलजोडण्या अशी कामे केली होतात. या कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या




मालाची म्हाडाच्या प्रयोगशाळेत चाचणी केली होते. मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी नागरी विकासाची सुमारे १२ हजार २३७ कामे देण्यात आली होती. त्यातील सुमारे १२०० कामांची तपासणी केल्यानंतर गुणवत्ता दर्जाची चाचणी केली नसल्याने निदर्शनास आले. तसेच कच्च्या मालाच्या दर्जाची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याचे उघड झाले. कंत्राटादरांनी कामाची गुणवत्ता राखली नाही. म्हाडाच्या प्रयोगशाळेत या मालाची गुणवत्ता तपासली जाते. तसेच कंत्राटदारांची ज्या ठिकाणी कामे सुरू असतात, तिथे जाऊन प्रयोगशाळेचे अधिकारी तपासणी करतात. त्यानंतर कामाच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राला झोपडपट्टी सुधार मंडळाचे अधिकारी अंतिम मंजुरी देतात. ही सर्व कामे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या फंडातून केली जातात. पण काही कंत्राटदारांनी बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश म्हाडाचे उपाध्यक्ष मिलिंद म्हैसकर यांनी दिले होते. त्यानंतर सुमारे ३७ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्णय घेतला.

# 'मला जास्त वाट पाहण्याची सवय नाही'



**मुंबई-** काँग्रेसला सोडचट्ठि देऊन भाजपच्या जवळ गेलेले नारायण राणे मंत्रिपदाची शपथ कधी घेणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरीतच आहे. याबाबत शुक्रवारी त्यांनी कुडाळमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रश्न वचिारला असता, 'मी मंत्री कधी होणार ते मुख्यमंत्र्यांना विचारा. मात्र मला जास्ती वाट पाहण्याची सवय नाही. लवकरच माझा मंत्रिमंडळात समावेश होईल,' असे राणे यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी अनेक वषियावर मते मांडली. ग्रीन रिफायनरीसारखे प्रदूषणकारी प्रकल्प कोकणच्या माथी मारू देणार नाही, असे प्रकल्प मी कोकणात येऊ देणार नाही, असा खणखणीत इशारा स्वाभिमान पक्षाचे संस्थापक, माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी शुक्रवारी कुडाळ येथे पत्रकार परिषद घेऊन दिला.

# 'भडकवणारे' आणि 'भडकणारे'

तो एक तरूण...अत्यंत हुशार... सर्वांचा लाडका...

हा मुलगा एकदा पोलिसांनी पकडला, गाड्या फोडताना...

गेला तुरूंगात, लागली केस, वारी सुरू झाली कोर्टाची....

करिअर गेलं, वर्षे वाया गेलं, जामीन पण नाही, जवळ पैसे नाहीत, आयुष्यातुन उठला..... का.....??

का तर याला कोणीतरी कुणाच्या तरी विरोधात भडकवले...

आणि...हे घडले....

हे एक प्रातिनिधीक उदाहरण आहे.

पण लक्षात ठेवा...

आज जगात दोन प्रकारचे लोक आहेत...

दुसऱ्याला भडकवणारे आणि भडकणारे .....

भडकवणारे दारू विक्रेत्याप्रमाणे द्वेष विकतात... आणि... भडकणारे दारूप्रमाणे द्वेष पितात...

दारूची नशा लगेच उतरते, पण, द्वेशाची नशा चढत राहते... आणि... एक दिवस ज्याप्रमाणे दारू विकणारा बंगले बांधतो... आणि... दारू पिणारा भिकारी होतो...

तसे भडकवणारे मोठे होतात आणि... भडकलेले, बरबाद होतात...

आज आपला तंबाखू सारखा वापर करून घेतला जातोय... यासाठी...

शिवाजी महाराजांचे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नांव घेतले जाते... त्यांच्या नावाने भडकावले जाते...

ज्याने भडकावले, त्याचा मुलगा स्टडीरूममधे... आणि...

जे भडकले ते कस्टडी रूममधे... ज्यांनी भडकवले त्याचा मुलगा अभ्यास करतोय... आणि... जे भडकले ते खडी फोडायचा अभ्यास करतेय...

ज्यानी भडकवले त्याचा पोरगा परदेशात शिकायला जातो... आणि... जे भडकले ते देशी प्यायला शिकतेय...

भडकवणाऱ्यांचा मुलगा फाड-फाड ईंग्रिश बोलतो, आणि... भडकणारा, बघून घेतो, तंगडंच काढतो, नादाला लागू नको, वावर गेलं तरी पावर नाय गेली पाहिजे, असं बोलतोय... भडकवणारे परदेशातून विमानाने भारतात येतात... आणि.... भडकणारे...

शिवाजीनगर-

१० रूपये...१० रूपये

संभाजीनगर -

५ रूपरे... ५रूपये...

बसा ना... ह्या बाजूला ... त्या बाजूला ...

गाडी भरली, की लगेच निघणार ...

१० रूपये ... ५ रूपये ...

भडकवणारे विमानतळावर उतरतात...

भडकणारे गर्दीत घोषणा देतात...

...आमके तमके आगे बढो... हम तुम्हारे साथ है... बजाव..... वन्सं मोर... ढिंगच्यांग ढिच्यांग....

भडकवणाऱ्यांचा पोरगा पंचतारांकित हॉटालात ऐटीत बसतो... आणि... भडकणारे तिथं वेटर असतात...

कुठे गेली लाज... कुठे गेला आत्मसन्मान...

छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव घेता.. डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे नांव घेता.. पण स्वाभिमान मात्र गहाण टाकलाय... लाजाही वाटत नाही ... अरे किती दिवस ...किती पिढ्यां.... आपल्या तरूणांना वाटत नाही कां...?

स्वतः काही तरी स्वाभिमान निर्माण करावा..

दुसऱ्याचे पाय चाटण्यापेक्षा स्वतःमधे आत्मविश्वास निर्माण करावा... दुसऱ्याला मोठं करण्यापेक्षा स्वतः मोठं व्हावे...

दुसऱ्याच्या झाडाला पाणी घालण्यापेक्षा, स्वतः चे रोपटे लावले तर ते मोठं झाड होतं...कधी कळणार आम्हाला हे...?

आज आमच्या पोरांचा केवळ वापर करून घेतला जातोय...

कुणाच्या तरी विरोधात..भांडण करण्यासाठी ...मारामारी करण्यासाठी... कसा होणार आमचा भारत देश महासत्ता....२१व्या शतकात आहोत.

पण आमची पोरं काय करतायेत....

वाद घालणे, भांडण करणे, मारामारी करणे...

हीच गोष्ट मनाला खटकत होती....वाईट वाटत होते... तळमळ वाटत होती...पण सांगणार कुणाला...???

एकमेकांशी वाद लावतोय, वापर करून घेतोय, स्वतःच्या पक्ष, संघटना वाढवतोय....



भावांनो,

वाद घालण्यापेक्षा स्वतःशी जर संवाद साधला तर यश मिळाल्याशिवाय राहणार नाही...

आपल्याला भडकावणाऱ्यांनी कधी स्वतःच्या मुलाला, भावाला, गाड्या फोडायला, मारामारी करायला लावले का?

का नाही लावत...???

अरे, विचार करा... आणि...

तरीही जर तुम्ही भडकवणाऱ्या लोकांचं ऐकत असाल तर तुमचं भविष्य अंधारात आहे...

विचार करा...

कुणाच ऐकून का बरबाद होता...???

या लोकांचं ऐकण्यापेक्षा स्वतःच्या नोकरी, व्यावसाय, धंदा, शिक्षण, घर, संसार इ. कडे लक्ष द्या...

कोणी जर कुणा विरोधात भडकवले तर त्याला सांगा...

अगोदर स्वतःच्या मुलाला सांग... त्याला गाड्या फोडायला लाव...

म्हणजे... काम करायाला आम्ही आरामाला तुम्ही ... बनवायला आम्ही खायला तुम्ही .... रस्त्यावर आम्ही पेपरात तुम्ही ... तुरूंगात आम्ही न्वर तुम्ही... हे आता थांबले पाहीजे....

तरूणांनो जागे व्हा....

दुसऱ्याला गुलाम म्हणणारे विचार करा...

आपण कुणाचे गुलाम नाही ना....??

आपला कुणी वापर करत नाही ना...??

विचार करा.

# 'बंद'चे श्रेय आंबेडकरांनी घेतल्याने आठवले गट अस्वस्थ



**मुंबई-** भीमा कोरेगाव येथील हिंसाचाराच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांचे तसेच समविचारी पक्ष-संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते, मात्र त्याचे श्रेय एकटे प्रकाश आंबेडकर घेत असल्याबद्दल केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. भीमा कोरेगाव हिंसाचाराच्या निषेधार्थ व राज्य सरकारने दोषींवर कारवाई करावी, यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्याला आंबेडकरी जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद देण्यात आला. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी प्रकाश आंबेडकर राहिले.

समाजाचा जीवनमरणाचा प्रश्न असतो त्यावेळी कार्यकर्ते गटतट विसरून आंदोलनात उतरतात, हा आजपर्यंतचा इतिहास आहे. कालचे आंदोलनही त्याला अपवाद नाही. प्रकाश आंबेडकर यांनी त्याचे नेतृत्व केले, हे चांगलेच झाले, परंतु त्यामुळे रामदास आठवले यांना विनाकारण आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे बरोबर नाही, अशी प्रतिक्रिया मुंबई रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष गौतम सोनावणे यांनी व्यक्त केली. तर आठवले यांचाही पक्ष बंदमध्ये सहभागी होता, असे जाहीर करावे, अशी मागणी काही जिल्ह्यातील पदधिकाऱ्यांनी केली आहे.

सध्याचे सामाजिक-राजकीय वातावरण, याचा आढावा घेण्यासाठी रामदास आठवले यांनी उद्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे.

# संपादकीय... अतिरेकी पाऊल



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

कोरेगाव भीमा येथील हिंसाचार आणि त्यानंतर झालेला 'महाराष्ट्र बंद' यांच्या पार्श्वभूमीवर पोलिसखाते जरा अतीच सावध झालेले दिसते. तसे नसते तर मुंबईतील भाईदास हॉलमध्ये होणाऱ्या 'छात्रभारती' या विद्यार्थी संघटनेच्या अधिवेशनाला ऐनवेळी अनुमती नाकारण्यात आली नसती. अर्थात, त्यानंतर लगेचच पोलिसांनी संभाजी भिडे यांच्या मुंबईतील प्रस्तावित जाहीर व्याख्यानालाही परवानगी नाकारली आहे.विकासाच्या प्रक्रियेत आपल्याही ताटात काही पडणार आहे असे समाजातील सर्व घटकांना वाटत नसेल तर काय होते हे भीमा कोरेगाव आंदोलन आणि त्या आधीचे मराठा समाजाचे मोर्चे यांनी दाखवून दिले आहे. म्हणूनच भीमा कोरेगाव येथील कथित विजयाचा द्विशतक महोत्सवी सोहळा, त्याच्या आगेमागे झालेला हिंसाचार आणि तदनंतर त्याचे पसरत चाललेले लोण यांचा विचार अन्य घटकांना तोडून करता येणार नाही. गेली काही वर्षे आपल्याकडे समाजाचे जे विघटकीकरण सुरू आहे त्याचाच परिणाम म्हणून समाजातील प्रत्येक समूहास आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवून देण्याची गरज वाटू लागली आहे. या विघटकीकरणाचे मूळ आहे निवडक विकासवादात. या निवडक विकासवादास कोण जबाबदार, कोणत्या राजकीय पक्षाचे किती चूक किती बरोबर वगैरे मुद्द्यांची चर्चा करण्याची ही वेळ नाही. तेव्हा आधी भीमा कोरेगाव संघर्ष आणि त्याचे परिणाम यांचा वेध घ्यायला हवा. अगदी अलीकडेपर्यंत भीमा कोरेगाव आणि तेथील विजय स्तंभ यांची पुणे जिल्ह्याबाहेर फार कोणास जाणीवदेखील नव्हती. कदाचित त्यामागे निवडकांच्या हाती असलेली इतिहास मांडणीची साधने हे कारण असू शकेलही. परंतु भीमा कोरेगावची लढाई हा तितका चर्चेचा विषय नव्हता, हे खरेच. या लढाईत दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा इंग्रजांनी पराभव केला. पेशवे यांचे सैन्यबळ इंग्रजांच्या तुलनेत मोठे होते. तरीही ते हरले. अत्यल्प संख्याबळ असूनही इंग्रजांना विजय मिळाला याचे कारण त्यावेळी इंग्रजांच्या वतीने लढणाऱ्या दलितांचे शौर्य, इतकीच ही कहाणी. ती घडली १ जानेवारी १८१८ या दिवशी. परंतु तिचे राजकीय महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ साली त्या स्थळास भेट देईपर्यंत जाणवले नव्हते. हेच वर्ष हे महाड सत्याग्रहाचे वर्ष त्या सत्याग्रहापूर्वी भीमा कोरेगावास भेट द्यावी असे बाबासाहेबांना वाटले ही बाब सूचकच. प्रत्येक समाजास भाळी लावण्यासाठी इतिहासातील एखादा तेजाळ तुकडा हवा असतो. कित्येक वर्ष अमेरिकेच्या किती तरी पट मोठे महासत्तापद भोगलेल्या इंग्रजांनाही याची गरज वाटली आणि त्यातून होरॅशिओ नेल्सन याच्या सागरी साहसकथा नव्याने सांगितल्या गेल्या. तेव्हा पिढ्यान्पिढ्या शोषित-उपेक्षित आयुष्यच जगलेल्या दलितांना इतिहासातील त्यांच्या शौर्यकथेची गरज वाटली असल्यास नवल नाही. ही शौर्यकथा बाबासाहेबांनी त्यांना शोधून दिली. तेव्हापासून या स्थानास महत्त्व आले. परंतु अलीकडच्या काळात दलितांचे राजकारण भलतीकडेच भरकटले. दलित पँथरचा तेजतर्रार काळ, मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर आणि नंतर रिडल्स इन हिंदुइझम या बाबासाहेबांच्या ग्रंथामुळे झालेला संघर्ष असे काही मोजके अपवाद सोडले तर दलित नेतृत्वाची परिणामशून्यताच या काळात दिसून आली. बाबासाहेबांनीच स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाची झालेली डझनभर शकले हेच दाखवून देतात. तेव्हा अशा कणाहीन नेतृत्वास आधी काँग्रेसने आणि नंतर भाजपने आपल्या पदराखाली घेऊन निष्प्रभ केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्गदर्शनाने चालणाऱ्या सरकारात रामदास आठवले यांचा समावेश हीच निष्प्रभता अधोरेखित करतो. (तसेच यातून ताज्या भीमा कोरेगाव संघर्षाच्या मिषाने प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्व कसे उठून उभे राहाते, हे देखील समजून घेता येते.) हे कमी म्हणून की काय केंद्र आणि राज्यात झालेला भारतीय जनता पक्षाचा उदय हा दलितांच्या जखमांवर निश्चितच मीठ चोळणारा ठरला. हाती सत्ता नाही, विकासाच्या प्रक्रियेत आणि शहरकेंद्रित विकासात काहीही स्थान नाही, वर परत आटत चाललेल्या रोजगाराच्या संधी या वातावरणात दलित समाजातील खदखद वाढत गेली असल्यास नवल नाही. म्हणूनच ब्राह्मणी वर्चस्वाचे प्रतीक असलेल्या पेशव्यांच्या पराभवाची आठवण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी ब्राह्मण असताना नव्याने काढली जाते, या मागील कार्यकारणभाव लक्षात घ्यायला हवा. वर्षानुवर्षे असलेली सत्तेवरची मक्तेदारी गेल्यानंतरच मराठा आंदोलन पेटले आणि मुख्यमंत्रीपदी फडणवीस असल्याने भीमा कोरेगाव संघर्षाच्या स्मृती तीव्र झाल्या, या दोन्हींमागचे कारण एकच आहे.



# अस्मितांचे अंगार



**समस्त जनतेला नम्र निवेदन**

भिमा कोरेगाव येथे घडलेली घटना अतिशय दुर्दवी घटना आहे. अनेक वर्षांपासून प्रतिवर्षी दलीत बांधव एकत्र येवून श्रध्दांजली अर्पण करीत होते. पण कधी अशी घटना घडली नाही. याच वेळी असे का व्हावे?

**आपण थोडा इतिहास पाहू.**

१९९५ मधे सेना भाजपा युतीचे बिगर काँग्रेसी सरकार आले. मा. मनोहर जोशी सर मुख्यमंत्री होते.काँग्रेस पक्षातील छुपे राष्ट्रवादी तेंव्हा एकत्र होते. युतीचे शासन धडाधड निर्णय घेत हौते. मुंबईत फ्लायओव्हरचे काम वेगात सुरु होते. कृष्णा खोरेचा अनेक वर्षाचा

प्रलंबीत प्रश्न मार्गी लावला होता. गोदावरी, तापी खोरे इत्यादी प्रकल्प आकार धरु लागले होते. सामान्य जनतेत हळू हळू युती अनुकूल परिर्वतन होत होते.भिमा कोरेगाव प्रमाणेच महाराष्टात शांत वातावरणात अचानक स्फोट झाला. रमाबाई आंबेडकर नगरात पळापळ सुरु झाली. रस्त्यावरील वहाने आंदोलकांच्या भक्ष स्थानी पडू लागली. अश्रूधूर, गोळीबार निष्पाप नागरीकांचे बळी पडले. बिन चिपळीचा नारद कामाला लागलेलाच होता. हळू हळू महाराष्ट्रात अशांतता निर्माण झाली. बिन चिपळीच्या नारदाचे अंतरग उफाळून वर आले. स्वतःला जाणता राजा म्हणवून घेण्यात धन्यता मानणाऱ्यांच्या पोटात वेगळे तर ओठात वेगळेच कसे असते याचे विषारी रूप जनते समोर आले. मा. मनोहर जोशींच्या नेतृत्वा खालील सरकार म्हणजे महाराष्ट्रात पेशवाई आल्याचा साक्षात्कार झाला. ओठात शाहू फुले आंबेडकर अन् पोटात दाउद ईब्राहीम कासकर!

रक्ताच्या थेंबा थेंबात भिनलेला जातीय अहंकार उफाळून आला. शेतकऱ्यांवरील प्रेम, आदिवासी, दलीत, अल्पसंख्यांकाचा कळवळा ढुंगणाखालची खुर्ची गेली की, मगच आठवतो.

सत्तेत असतांना भोतमांगे कुटूंबावर झालेला अन्याय तसेच गोवारी हत्याकांड! शेकडो मैलांवरून पायपिट करुन न्याय मागण्या करीता आलेल्या ११४ आदिवासी गोवारींचा झालेल्या हत्यांकडे दुर्लक्ष करुन शासकीय विमानाने आबासाहेब कुळकर्णींच्या सूतगिरणीच्या उद्घाटनाला इचलकरंजीला जाण्याचे काम जाणता राजाच करु शकतो. एवढी सहृदयता (?) अन्य कुठल्याही मनुष्यप्राण्यात सापडणे शक्यच नाही. नागपूरच्या मेयो हॉस्पिटल मधे ११४ आदिवासी गोवारींचे मृतदेह पडले होते. त्यांच्या कुटूंबांचा, दगडाला सुद्धा पाझर फुटावा असा अक्रोश हृदय पिळवटून टाकत होता. जाणते राजे होते इचलकरंजीत!

मी त्या अतिशय दुर्दवी घटनेचा साक्षीदार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या १९८५ मधे यांच्याच कॉग्रेसी राजवटीत सुरु झाल्या.

आज तागायत एकाही आत्महत्याग्रस्थ कुटूंबाची भेट घेण्याची तसदी कधी घेतली नाही. हेच यांचे शाहू फुले आंबेडकरांचे विचार आहेत का?

या महान समाज धुरिणांनी गरीबातल्या गरीबाला सन्मान समनतेची वागणूक मिळावी या करीता सम्पूर्ण जीवन एकाच कामासाठी अर्पण केल! असो!!

आज या सर्व घटनांची आठवण यावी हा योगा योग नव्हे तर, राज्यात पुन्हा तोच खेळ गरीबांच्या जीवावर बिन चिपळीच्या नारदाने मांडला आहे. भाजपा सेना युतीच्या सरकार विरोधी यात्रा झाल्या कुणी हिंग लावून भिक घातली नाही. मग पदयात्रा झाल्या! मोर्चा झाला! खुर्ची नजरेच्या टप्यात दिसत नाही. आता जातीय द्वेषाचे हत्यार उपसले. मुख्यमंत्र्यांच्या जातीची तीव्रतेने बिन चिपळीच्या नारदास आठवण झाली. पुन्हा एकदा पेशवाईची आवई ठोकली. यांच्या रक्ताच्या थेंबा थेंबात किती जातीय द्वेष आत पर्यंत भिनला आहे याची महाराष्ट्राला वीस वर्षानंतर पुनश्च एकदा जाणीव झाली.

वस्तुतः माननिय नरेंद्र मोदी व माननिय देवेंद्र फडणविस यांच्या नेतृवा खालील सरकारे आल्या नंतर देशात व राज्यात एकही धार्मिक अथवा जातीय दंगल विरोधक ठरवून सुद्धा घडवू शकले नाहीत. १३२ वर्षाच्या जुन्या पक्षाला व त्यांच्या छत्रछायेत जगणाऱ्या प्रादेशिक पक्षास स्वबळावर देशात व राज्या राज्यात निवडणूका लढविण्याची शक्ती राहिलेली नाही. त्यांचा पूर्णतः शक्तीपात झाला आहे. जनता विश्वास ठेवायला तयार नाही.

सवर्ण विरुद्ध दलीत भांडण लावणे दिवसे दिवस कठीण होत चालले आहे. केंद्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम युद्ध पातळीवर हाती घेतले आहे. डॉ.बाबासाहेबांच्या वास्तव्याने पवित्र झालेली इमारत राज्य शासनाने खरेदी करुन तेथे स्मारकाच्या निर्मितीचे काम वेगाने सुरु आहे. राज्यात ज्या ज्या ठिकाणी डॉ.बाबासाहेबांचे वास्तव्य होते ती ती स्थळे स्मारकात रुपांतर करण्याचा निर्णय घेवून कामास गती दिली आहे. महाराष्ट्रात यापूर्वीही जातीय तणाव निर्माण करण्याचे उद्योग अनेकांनी करुन पाहीलेत. पण सुदैवाने फारसे यश कुणासही प्राप्त झाले नाही. दोनशे वर्षापूर्वीच्या ऐतिहासिक घटनेचे निमित्त करुन एकमेकांच्या जीवावर उठण्या इतपत समाजा समाजा मधे भांडणे लावण्याचे कृत्य हृदयशून्य व्यक्तीच करु शकते. यालाच सत्तापिपासू म्हणतात. सत्तेशिवाय होणारी तडफड मला मान्य आहे.पण यासाठी निष्पापांच्या रक्ताची आहुती देणारी मनोवृत्ती मूळा सकट उखडून फेकावी लागेल! कारण बिन चिपळ्याच्या नारदाचे शेवटचे आवाहन घातक आहे.' दलीतांनी व मराठा समाजाने सामंजस्याने वागावे' या वाक्यतच सर्व काही आले. पेशवाईची आवई ठोकून ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाला खत पाणी घालायच! दुसऱ्या बाजूला दलीतांना चेतवून द्यायच! निवडणुका जवळ आल्या, तय्यार रहा! आता आपले अन्य सर्व प्रयत्न फोल गेले आहेत. शिवसेनेला डिवचून पाहीले. विरोधकातील स्वजातीयांना गोंजारुन झाले. हाती काही लागेना! दिल्लीत मोदींचे एक चालकानु नेतृत्व असल्याने काही थांग लागत नाही.

मा. ममता बॅनर्जी, मा. मायावतीजी, मा.मुलायमसिंग,मा. नितीष कुमार, स्व. जयललीताजी, कालच राजकारणात आलेले मा. केजरीवाल असे किती किती नेते स्वबळावर आपल्या राज्यात सत्ता काबीज करुन राज्य स्थापन करुन गेले. आम्ही भलेही देशाचे नेते म्हणवून घेतले. पण आमच्याच राज्यात आम्ही स्वबळावर सरकार तर, सोडाच पण २८८ आमदारांच्या २५टक्के म्हणजे ७२ आमदार सुद्धा निवडून आणू शकलो नाही. हे दुखः आम्ही सांगाव तरी कुणाला?

पक्षात स्वजातियांचा भरणा असल्याने समोर कुणी बोलत नाही. पण तेही आता आपली कुवत समजून गेलेत! मग काय चला चला जाती जातीत तरी पेटवून देऊ, बघू काही हाती लागते का?

**सावधान!! बिन चिपळ्याचा नारद लागलाय कामाला!!**

**अनिल गोटे**
**(आमदार)**

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता कराल तर.. सावधान!

## दंडात्मक कारवाई करण्याचा मीरा-भाईंदर महापालिकेचा निर्णय

**भाईंदर- सार्वजनिक ठिकाणी घाण टाकणार असाल अथवा अस्वच्छ करणार असाल तर यापुढे सावधान.. अशा नागरिकांना आता दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. शहर अस्वच्छ करणाऱ्यांवर दंड आकारण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आल्याने मीरा-भाईंदर महानगरपालिकेने या आदेशांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत 'स्वच्छ शहर मोहीम' सर्वत्र राबवण्यात येत आहे. शहरांची स्वच्छता राखणे या महत्त्वाच्या मुद्द्याचा यात समावेश आहे, परंतु अनेकवेळा आवाहन करूनही नागरिकांकडून सार्वजनिक ठिकाणांची अस्वच्छता करण्याचे काम सुरूच असते. रस्त्यात कचरा फेकणे, थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणे तसेच शौचाला बसणे या नागरिकांच्या सवयी अद्याप दूर झाल्या नसल्याने स्वच्छता अभियानात मोठाच अडसर होत आहे.

### असा असेल दंड...

**सार्वजनिक अथवा खासगी ठिकाणी निष्काळजीपणे**
**कचरा टाकल्यास : १५० रुपये**
**सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास :१०० रुपये**
**उघड्यावर लघुशंका केल्यास : १०० रुपये**
**उघड्यावर शौचाला बसल्यास : ५०० रुपये**

आता नागरिकांच्या या सवयीला वेसण घालण्यासाठी त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश शासनाने सर्व महान्पालिकांना दिले आहेत. या आदेशांची मीरा-भाईंदर महापालिकेकडून कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

नागरिकांना उघड्यावर शौचाला बसू नये अथवा लघुशंका करू नये यासाठी महापालिकेने विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत. शहर अस्वच्छ केल्याबद्दल नागरिकांवर दंड आकारण्याचे अधिकार मात्र महापालिकेला नव्हते. यासंदर्भातले दंडात्मक करावाईचे शुल्क निश्चित करून ते नियम महानगरपालिकेने मान्यतेसाठी शासनाकडे काही वर्षांपूर्वी पाठवले आहेत, परंतु शासनाकडून त्याला मान्यता मिळाली नसल्याने दंड वसूल करणे प्रशासनाला अशक्य झाले होते. परिणामी नागरिकांना शहर अस्वच्छ करण्यापासून रोखण्यासाठी त्यांना विनंती करणे, सुरक्षा रक्षक नेमणे आदी उपाययोजना केल्या. मात्र त्यानंतरही नागरिक ऐकत नसल्याने प्रशासनाने गांधीगिरीचा अवलंब केला. उघड्यावर लघुशंका अथवा शौचाला बसल्यास संबंधित व्यक्तीला गुलाब फुल देणे अथवा त्याला हार घालून त्याचा सत्कार करणे यासारखे उपायही केले आहेत, परंतु या उपायांचाही फारसा परिणाम झाला नसल्याचे दिसून आले.



# ठाण्यात पंधरवड्यात एक दिवस पाणीबंद

**ठाणे -** ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणीपुरवठा यापुढे १५ दिवसातून एकदा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार येत्या शुक्रवारी २४ तासांसाठी कळवा, विटावा, दिवा, मुंब्रा, कौसा या उपनगरांसह ठाणे शहराच्या काही भागातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची चिन्हे आहेत.



ठाणे महापालिका विविध स्रोतांमार्फत पाणी उचलून त्याचे शहरातील वेगवेगळ्या भागात नियोजन करते. महापालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडूनही ११० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जिल्यातील बारवी धरणामधून पाणी उचलते. बारवी धरणातील पाणीसाठी जुन महिन्यापर्यंत पुरविण्यासाठी लघुपाटबंधारे विभागाने १५ टक्के पाणीकपात लागू केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने येत्या शुक्रवारपासून सुरू केली असून यापुढे दर १५ दिवसातून एकदा बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या विभागाकडून शहरातील काही भागांना होणारा पाणीपुरवठा गुरुवारी रात्री १२ ते शुक्रवार रात्री १२ वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

# डेब्रिजविरोधी भरारी पथक निद्राधीन?

**नवी मुंबई-** सी-वूड्स रेल्वेस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकण्यात आले आहे. पालिका क्षेत्रात परवानगी न घेता डेब्रिज टाकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डेब्रिजविरोधी भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे, मात्र या पथकाचे सी-वूड्स येथील डेब्रिजकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे.

नवी मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या वाशी व ऐरोली पुलावरून डेब्रिज भरलेल्या अनेक गाड्या येताना दिसतात. हे डेब्रिज कुठे टाकले जाते, त्यासाठी पालिकेची परवानगी घेतलेली असते का, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सी-वूड् रेल्वेस्थानकाजवळच्या सेक्टर २५ येथे रेल्वेमार्गाजवळ मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकण्यात येत आहे. ढिगारे साचले असताना पालिकेच्या डेब्रिजविरोधी भरारी पथकाला मात्र याचा पत्ताच नाही. सी-वूड्स रेल्वेस्थानकाच्या पूर्वेला अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकण्यात आले आहे. डेब्रिज टाकून ते सपाट करून नंतर त्यावर बेकायदा झोपड्या वसवल्या जातात. त्यामुळे सी-वूड् विभागासह



शहरात बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

शहरात दोन डेब्रिजविरोधी भरारी पथके आहेत. वाशी व ऐरोली विभाग कार्यालयाअंतर्गत व पालिकेच्या घनकचरा विभागामार्फत त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात येते, परंतु शहरात डेब्रिजचे ढिगारे पडत असताना भरारी पथक कोठे असते, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

दोन भरारी पथकांसाठी दोन वाहने, कर्मचारी, सुरक्षारक्षक असतात. असे असूनही शहरात डेब्रिज साचत असल्यामुळे पथकाच्या कार्यक्षमतेवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# उपाहारगृहांवर कारवाईचा बडगा

## *आग प्रतिबंधक उपाययोजना नसल्यास पाणी आणि वीजपुरवठा खंडित*

**नवी मुंबई-** मुंबईमधील कमला मिल दुर्घटनेनंतर राज्यातील सर्व पालिका आणि नगरपालिका हद्दीतील उपाहारगृह, हॉटेल, बार आणि पब यांची तपासणी करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. नवी मुंबई पालिका प्रशासनाने विभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या हद्दीतील उपाहारगृहाची तपासणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ज्या उपाहारगृह, बार, पब यांच्याकडे अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र नाही त्यांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहेत. बेलापूर व नेरुळ येथील काही बेकायदेशीर बांधकामे केलेल्या उपाहारगृहावर कारवाई करण्यात आलेली आहे.



मागील आठवड्यात मुंबईत घडलेल्या कमला मिल आग दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर राज्य सरकारने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील उपाहारगृह, बार, रेस्टॉरंट आणि पब यांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पनवेल, नवी मुंबई पालिकेने शहरातील सर्व उपाहारगृहाची तपासणी सुरू केली आहे.

पनवेल पालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी तर शहरातील सर्व हॉटेल मालकांना तंबी दिली आहे. ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय एकही हॉटेल सुरू न करता हॉटेल बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. नवी मुंबई पालिका आयुक्त डॉ. रामास्वामी यांनीही शहरातील सर्व हॉटेलांची तपासणी करण्याचे आदेश दिलेले आहेत. या तपासणीत बेलापूर व नेरुळ येथे बेकायदेशीर बांधकामे आढळलेली १८ हॉटेलावर कारवाई करण्यात आलेली आहे. शहरातील अनेक हॉटेल मालकांनी मार्जिनल स्पेसचा वापर करताना बेकायदेशीर बांधकामे व अतिक्रमण केलेले आहे. पालिकेच्या कारवाईने यातील काही जणांनी ही बांधकामे काढून टाकण्यास सुरुवात केलेली आहे.

# मुंबई-गोवा मार्गावर वाहतूक बंदचे वेळापत्रक

**कर्जत-** रायगड जिल्ह्यात जादा पर्यटक येण्याची शक्यता लक्षात घेता, येत्या ३० ते ३१ डिसेंबर व १ जानेवारी २०१८ (शनिवार ते सोमवार) दरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक बंद करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले होते. त्यानुसार या अवजड वाहतूकीचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. पर्यटक येण्याच्या वेळा गृहित धरुन हे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

रविवार दि.३१ रोजी सकाळी ८ ते रात्री १० आणि सोमवार दि. १ जानेवारी २०१८ रोजी दुपारी १२ ते रात्री १० यावेळात अवजड वाहतुक बंद ठेवण्यात येईल.

यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. सूर्यवंशी यांनी सर्व संबंधित विभागांची बैठक बोलावून पर्यटकांची गैरसोय होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यात महामार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. या वाहतुकीचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी व वाहतूक पोलिसांनी करावे. वाहतुकीच्या कोंडीस कारणीभूत ठरणारे महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजविण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या होत्या.

समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सागरी किनाऱ्यांवर सकाळी सात ते रात्री बारा वाजेपर्यंत जीवरक्षकांची पथके तैनात ठेवणे. प्रवासी व साहसी खेळाच्या बोटींवर प्रवासी संख्या मर्यादित ठेवणे. प्रवाशांना जीवरक्षक उपकरणे परिधान केल्याशिवाय साहसी खेळांकरीता प्रवेश देऊ नये. किल्ल्यांवर पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने प्रवाशांचे सामान तपासणी करुनच त्यांना किल्ल्यांवर प्रवेश देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी डॉ. सूर्यवंशी यांनी केल्या होत्या. या सुचनांच्या अंमलबजावणीसाठी वाहतूक पोलीस व अन्य विभाग नियोजन करीत आहेत.

# भारतासाठी धोक्याची घंटा

## पाकमध्ये चाबहारजवळ चीनचे आणखी एक लष्करी तळ

**नवी दिल्ली - अमेरिकेने आर्थिक मदत बंद केल्यानंतर पाकिस्तान आणि चीनमधील जवळीक आणखी वाढली आहे. चीनने पाकिस्तानमध्ये आणखी एक लष्करी तळ उभारण्याचा निर्णय घेतला असून हे तळ इराणमधील चाबहार बंदराजवळ असेल. भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या चाबहार बंदर महत्त्वाचे असून याद्वारे भारताला शह देण्याची खेळी चीनने खेळली आहे.**



अफगाण तालिबान व हक्कानी नेटवर्क या दहशतवादी संघटनांवर कारवाई करण्यात कुचराई केल्याने अमेरिकेने पाकिस्तानची १.१५ अब्ज डॉलर्सची मदत रोखली. अमेरिकेमुळे पाकवरील दडपण वाढले असतानाच दुसरीकडे चीन पाकच्या मदतीला धावून आला आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक पट्ट्यात चलनात डॉलरऐवजी चीनच्या 'युआन'चा वापर केला जाणार आहे. यापाठोपाठ आता चीन पाकमध्ये आणखी एक लष्करी तळ उभारणार असल्याचे वृत्त आहे.

इराणमधील चाबहार बंदरापासून जवळच पाकिस्तानच्या हद्दीत जिवानी येथे चीन लष्करी तळ उभारणार आहे. चाबहार बंदरामुळे भारत- अफगाणिस्तान- इराण या देशांमधील व्यापारी संबंध दृढ झाले आहेत. इराणच्या आखातात होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या तोंडावर वसलेल्या चाबहार बंदरामुळे भारताला या विभागात सामरिक फायदा झाला. चाबहार जवळच पाकिस्तानच्या किनाऱ्यावरील ग्वादर हे बंदर चीन विकसित केले आहे. त्यामुळे भारतासाठी चाबहार बंदर महत्त्वाचा आहे.

फेब्रुवारी २०१६ मध्ये चीनने जिबौती येथे लष्करी तळ उभारण्याचे काम सुरु केले होते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांततेच्या मोहीमेत नौदल व लष्कराला मदत करण्यासाठी आणि सोमालिया व अडेनच्या आखातातील सुरक्षा मोहीमेंसाठी जिबौतीमध्ये लष्कर तळ उभारण्याचा निर्णय घेतल्याचे चीनने म्हटले होते.

आता चीनने पाकमध्ये दुसरे लष्करी तळ उभारण्याचा निर्णय घेतल्याने भारताची डोकेदुखी वाढली आहे. या क्षेत्रातील सागरी मार्गांवरील पकड मजबूत करण्यासाठी चीनने हे तळ उभारण्याच्या हालचाली सुरु केल्याचे सांगितले जाते. ग्वादर बंदराजवळच हे तळ उभारले जाईल, असे समजते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नववर्षदिनी ट्विटरद्वारे पाकला खडेबोल सुनावले होते. आम्ही पाकला दहशतवाद्यांवर कारवाई करण्यासाठी पैसा दिला, मात्र त्यांनी आमची फसवणूकच केली, असा आरोप करत ट्रम्प यांनी पाकची रसद रोखली. या घडामोडी ताज्या असतानाच चीनने पाकशी जवळीक वाढवत अमेरिका आणि भारताला शह देण्याचा प्रयत्न केला आहे.

# विचार करा

**ज्या गोष्टीचे जगाला काहीच नवल वाटत नाही अशा गोष्टींना भारतात डोक्यावर घेतले जाते**

***इंग्रजी:*** जगात कुठेही नसेल इतके इतके महत्व भारतात इंग्रजी भाषेला दिले जाते? इंग्रजी बोलता येत नसेल तर तो अडाणी समजला जातो... अरेरे...!

***गोरेपणा:*** गोरेपणाला भारतीय मूर्ख मंडळी एवढे भुललेत की या गोष्टीचा फायदा घेऊन काही नामवंत कंपन्या गोरे बनवण्याचा क्रिम तयार करुन दरवर्षी हजारो कोटी रुपये कमवतात.

***रिॲलिटी शो:*** यात तर सगळं ठरवून केलं जातं आणि भारतीय मूर्खासारखे खरं समजून बघत बसतात! त्यामुळे वास्तविक खरोखर असणारे कलाकार पडद्यामागे राहतात हेच खूप मोठे दुर्दैव आहे.

***लग्नसमारंभ:*** बडेजाव आणि प्रतिष्ठा दाखवण्याचा सर्वात मोठा मार्ग काही मुलीच्या बापांना तर २५ वर्षे जीव लावलेल्या मुलीच्या विरहापेक्षा दिखावा महत्वाचा वाटतो.

***इंजिनियरिंगची पदवी:*** ७० टक्के मुलांच्या बापांना आपल्या मुलाने समाजसेवक नामवंत खेळाडू देशभक्त बनण्यापेक्षा इंजिनियरिंग पदवी मिळवून श्रीमंत बनावं असेच वाटते. बाकीच्या क्षेत्रात नोकरी करणे काय पाप आहे का?

***क्रिकेट:*** भारतात क्रिकेट हा खेळ नसून धर्मच मानून त्याची पूजा केली जाते. लाखोंची सट्टेबाजी चालते. भारतातील इतर अनेक खेळांना जगात डिमांड मिळते. भारतात फक्त क्रिकेटच पाचवीला पूजलाय!

***सोने:*** जगात ज्या सोन्याचा सर्वांना कंटाळा येतो तेच सोने मिळवण्यासाठी भारतीय महिला जणू काय शपथच घेऊन बसल्यात. त्याच सोन्याची भारतात जीवघेणी चोरी सुद्धा होते.



***लोक काय म्हणतील?:*** हे केले तर लोक काय म्हणतील... ते खाल्ले तर लोक काय म्हणतील. हे कपडे घातले तर लोक काय म्हणतील. अरे काय चाललंय? लोकांच्या म्हणण्याने चालाल तर मूर्ख बनाल! आत्महत्या करणारे पण हाच विचार करतात लोक काय म्हणतील? मी तर यांना अर्धवटच म्हणतो.

***बोर्डाची परीक्षा:*** जगात कुठे इतके महत्व दिले जात नाही एवढे भारतात बोर्डाच्या परीक्षेला महत्व दिले जाते. किती तरी मुलं तर बोर्डाची परीक्षा ऐकूनच एवढे घाबरतात की ते परीक्षेला सुद्धा जात नाहीत.

***परदेशी ब्रँड:*** ज्या वस्तू परदेशात कचऱ्यात टाकून दिल्या जातात त्या गोष्टी भारतात लाखो रुपये मोजून खरेदी केल्या जातात. जे कधी कधी माणसांच्या नावावर खपवले जातात.

***कसले हे दुर्दैव***

भारतातील ज्या इतिहासाचा जगात आदर्श घेतला जातो तोच इतिहास भारतात चुकीचा आणि खोटा सिद्ध केला जातो. कमाल आहे राव?

**देश कुछ इस तरह भी बदलने लगा है कि लोग गाय चराने में शर्म और कुत्ता घुमाने में गर्व करने लगे हैं..**

# धक्कादायक! भारतात होतात रोज ३,६०० बालविवाह!

## मानवी आयोगाने घेतली गंभीर दखल

**भुवनेश्वर-** भारतात रोज होत असलेल्या सुमारे ३,६०० बालविवाहांची गंभीर नोंद घेत, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्यांना ही सामाजिक कुप्रथा नष्ट करण्यासाठी अत्यंत कठोर धोरण अवलंबून २००६ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. आयोगाचे सरचिटणीस अंबुज शर्मा यांनी गुरुवारी बालविवाहावरील विभागीय परिषदेत सांगितले की, १८ वर्षांखालील मुलांचे विवाह ही राष्ट्रीय समस्या बनत चालली आहे. ते थांबविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कृती योजना तयार करणे हा या परिषदेचा हेतू आहे. कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करताना संबंधित संस्थांपुढे असलेली आव्हाने आणि बालविवाहांचा शोध लावणे व त्याची नोंद करण्यासाठी निकष तयार करण्यावरही चर्चा होईल.



जगात होणाऱ्या बालविवाहांपैकी ४० टक्के भारतात होतात. रोज ३,६०० असे विवाह लागतात, असे आयोगाने नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्युरोच्या (एनसीआरबी) हवाल्याने निवेदनात म्हटले आहे. प्रत्यक्षात मोजक्याच बालविवाहांची नोंद होते. सन २०१५ आणि २०१६ मध्ये अनुक्रमे २९३ व ३२६ बाल विवाहांची नोंद बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये झाल्याची एनसीआरबीकडे नोंद आहे.

# बंगळूरूत मॅनहोलमधील विषारी वायूमुळे ३ सफाई कामगारांचा मृत्यू

**बंगळूरु-** मानवी हक्काच्या उल्लंघनाची मोठी घटना बंगळूरुत घडली असून तीन सफाई कामगारांचा मॅनहोलमध्ये उतरुन स्वच्छतेचे काम करताना विषारू वायूने मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे दक्षिण बंगळूरुतील उच्चभ्रू परिसरात ही घटना घडली आहे.



हाताने मैला उचलण्याच्या अमानुष पद्धतीवर भारतात कायद्याने बंदी असतानाही बऱ्याच भागात अजूनही हे थांबलेले नाही. अनेकदा सफाई कामगार मेनहोलमध्ये उतरून काम करताना दिसतात. नारायण स्वामी (वय ३५), महादेव गोवडा (४२) आणि श्रीनिवास (५२) या तिघांचा मॅनहोलमध्ये उतरल्याने विषारु वायूमुळे मृत्यू झाला. मॅनहोलमध्ये उतरल्यानंतर स्वामी आणि गोवडा यांचा जागीच मृत्यू झाला मात्र, महादेव यांना उपचारांसाठी कोलंबिया एशिया रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले मात्र, तेथे त्यांचा मृत्यू झाला.

# लालूप्रसाद जेलमध्ये माळी काम करणार

**पाटणा–** चारा घोटाळाप्रकरणी साडेतीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावलेले राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांना तुरुंगात नवं काम मिळालं आहे. रांचीमधील बिरसा मुंडा तुरुंगात त्यांना माळी काम करावं लागणार आहे. मोबदला म्हणून त्यांना दररोज ९३ रुपये मिळणार आहेत, असं सूत्रांनी सांगितलं.



लालूप्रसाद यांची हजारीबाग येथील तुरुंगात रवानगी करण्यात येईल. दरम्यान, तुरुंगवासाची शिक्षा सुनावल्यानंतर राष्ट्रीय जनता दल त्यांच्या जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेणार आहे. लालूप्रसाद यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली असती तर, विशेष न्यायालयातच त्यांना जामीन मिळण्याची शक्यता होती. तीन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाल्याने आता जामिनासाठी उच्च न्यायालयात जावे लागणार आहे.

# पाचशे रुपयांत 'आधार'ची गोपनीय माहिती मिळते, ही बाब उघड करणाऱ्या पत्रकारावर गुन्हा दाखल

**नवी दिल्ली-** देशभरात विविध सरकारी योजनांसाठी, बँक खात्यांसाठी आणि मोबाईल सिमकार्डसाठी आधार क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. प्रत्येक नागरिकासाठी आधार क्रमांक विशेष ओळख ठरला आहे. या आधार क्रमांकासाठी प्रत्येकाची महत्वाची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. मात्र, हीच महत्वाची गोपनीय माहिती सुरक्षित नाही. केवळ ५०० रुपयांमध्ये कुणाच्याही आधारची गोपनीय माहिती मिळवता येते, ही गंभीर बाब उघड करणाऱ्या ट्रिब्युन या इंग्रजी वृत्तसंस्थेच्या एका पत्रकाराविरोधात आधार प्रशासनाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युआयडी अर्थात आधार प्रशासनाची ट्रिब्युनने दिलेल्या या वृत्तामुळे झोप उडाली होती. आधारची गोपनीय माहिती




उघड होऊ शकत नाही असा दावा युआयडीने केला आहे. मात्र, यातील फोलपणा समोर आणल्याने युआयडीच्या विश्वासाऱ्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये यासाठी रचना खैरा या महिला पत्रकाराविरोधात हा गुन्हा दाखल झाला. केवळ ५०० रुपये मोजल्यास कोणाच्याही आधार क्रमांकावरील गोपनीय माहिती मिळते अशी बातमी रचना यांनी छापली होती. त्याचबरोबर अधिकचे ३०० रुपये दिल्यास आधार कार्ड प्रिंटिंगचे सॉफ्टवेअरही मिळते, असे या बातमीत म्हटले आहे. या वृत्तामुळे देशभरात खळबळ माजली होती. त्यानंतर युआयडीने तातडीने निवेदन प्रसिद्ध केले होते. आधारची माहिती पूर्णपणे सुरक्षित असून यासंदर्भातील बातमी खोटी असल्याचा दावा यात करण्यात आला होता. त्यानंतर यासंदर्भातील बातमीप्रकरणी रचना खैरा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# योगी सरकार आता धार्मिक स्थळांवरील अवैध लाऊडस्पीकर हटवणार

**लखनऊ-** योगी आदित्यनाथ सरकार आता उत्तर प्रदेशमधील धार्मिक स्थळांवरील अवैध लाऊडस्पीकर हटवण्याची मोहीम हाती घेणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकार यासंबंधी पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रतीसह गृह विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून धार्मिक स्थळांवरील लाऊडस्पीकर हटवल्यानंतरचा अहवाल मागितला आहे.

विना परवानगी लावण्यात आलेले लाऊडस्पीकर काढण्यात येतील, असे यात म्हटले आहे. यासाठी १५ जानेवारी पर्यंत परवानगी घेता येणार आहे. दि. १५ नंतर कोणत्याही संस्थेला परवानगी देण्यात येणार नाही. १६ जानेवारीपासून सर्व जिल्ह्यांमध्ये अभियान राबवून विना परवानगी असलेले लाऊडस्पीकर काढण्यास सुरूवात होईल. हे



अभियान २० जानेवारीपर्यंत चालेल आणि पुन्हा त्याचा अहवाल बनवून राज्य सरकारला पाठवण्यात येणार आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने डिसेंबरमध्ये धार्मिक स्थळांवर लावण्यात आलेल्या लाऊडस्पीकरबाबत नाराजी व्यक्त केली होती. न्यायालयाने याप्रकरणी उच्चाधिकाऱ्यांना फटकारत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा आदेश दिला होता. न्या. विक्रम नाथ आणि न्या. अब्दुल मोईन यांच्या खंडपीठाने म्हटले होते की, प्रमुख गृह सचिव, नागरी सचिवालय आणि उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्षांना सहा आठवड्यात वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करून ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या? याप्रकरणी आता १ फेब्रुवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

पृष्ठ १ वरुन

# जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रतर्फे ठाणे महापौराच्या हस्ते पत्रकारांना पुरस्कार प्रदान

**ठाणे महानगरचे वृक्षप्राधिकरणाचे राहूल लोंढे, जर्नलिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष नारायण पांचाळ, उपाध्यक्ष जयराम सावंत, जनरल सेक्रेटरी प्रो. हेमंत सामंत, सचिव प्रविण दवणे, खजिनदार सतीश साठम, नामदेव काशीद, ठाणे युनिट अध्यक्ष दिनेश शिंदे, सचिव मनजित सिंग अरोरा आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.**

**महापौर मिनाक्षी शिंदे, शैलेंद्र मिश्र, राहूल लोंढे यांनी पत्रकारांच्या भुमिकेबाबत आपले मत व्यक्त केले. प्रविण दवणे यांनी पत्रकार हा असतो आरसा या आशयावर कविता सादर केली. याप्रसंगी मिरा भाईंदरचे आजारी असलेले पत्रकार इंग्लीश खान यांना मिरा भाईंदर युनिटच्या निधीतून १०,००० रुपयांची आर्थिक मदत अध्यक्ष नारायण पांचाळ यांच्यामार्फत देण्यात आली. याकार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर दत्ताराम म्हात्रे यांनी पोवाडे गाऊन केल्यामूळे त्यांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण विभागातील युनिटचे पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.**





# रिझर्व बँकेच्या कार्यालयाबाहेर नोटांचा 'काळा बाजार', हजारला १३०० चा भाव

**जयपूर-** 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'च्या राजस्थानमधील कार्यालयाबाहेर नोटांचा काळा बाजार सुरु असल्याचे समोर आले आहे. १० रुपयांच्या नोटांच्या बंडलसाठी (१०० नोटांसाठी) १,३०० रुपयांचा भाव असून १० रुपयांच्या नोटांचा बाजारात तुटवडा असल्याने या नोटांचा भाव वधारला आहे. 'राजस्थान पत्रिका' या वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार जयपूरमधील आरबीआयच्या कार्यालयाबाहेर नोटांचा काळाबाजार



करणारे एक रॅकेटच सक्रीय झाले आहे. बँकेबाहेरील सुरक्षा रक्षकच ग्राहकांना या दलालांकडे पाठवत असल्याचे वृत्तात म्हटले आहे. विशेष म्हणजे आरबीआयच्या कार्यालयातच १० रुपये, ५० रुपये आणि १०० रुपयांच्या नोटा मिळत नाही. मात्र, बँकेबाहेर फिरणाऱ्या दलालांच्या बॅगेत याच नोटांचे बंडल दिसून आले. बँकेतील कर्मचारीच आम्हाला नोटांचे बंडल पुरवतात, असे या दलालांचे म्हणणे आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)